# प्रश्नमंजुषा

सेवा योजनेच्या वतीने ६ मे २०२० ला covid-19 प्रश्नमंजुषा चे आयोजन करण्यात आले होते.ही प्रश्नमंजुषा कोविड वर आधारित प्रश्नावली तयार करून गुगल फार्ममध्ये ही प्रश्नमंजुषा घेण्यात आली होती.या प्रश्नमंजुषा मध्ये नागपुरातील जवळपास 400 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला होता.या प्रश्नमंजुषेत सहभागी विद्यार्थ्यांना.online प्रमाणपत्र देण्यात आले होते.


Param Poojya Dr. Babasaheb Ambedkar Smarak Samiti's
Dr. Ambedkar College
Deeksha Bhoomi, Nagpur
Re-accredited With 'A' Grade By NAAC
Recognized As College With Potential For Excellence By UGC

Certificate

This is to Certify that
Payal Ratnnadeep Sawant
{{Institute}}
Has Completed
Covid-19 National Online Quiz Competition Organised by
National Service Scheme, Dr. Ambedkar College, Deekshabhoomi, Nagpur
On 5/5/2020.

Ratnnadeep Sawant, Coordinator | Dr. Ravindra Tirpude, NSS Program Officer | Prof. R. V. Patil, Principal



## भोजनदान,पाणी वाटप

भारताचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण भारतात covid-19 च्या काळामध्ये संपूर्ण देशात डाऊन ची घोषणा केल्यामुळे अनेक लोकांचा रोजगार हिरावला गेला . त्यामुळे अनेक लोकांनी एका शहरातून स्वतःच्या गावाकडे पलायन करणे सुरू केले होते . रस्त्यावर भीक मागणारे तसेच हात मजुरी करणाऱ्या लोकांना जेवण मिळत नव्ह ते अशा काळात डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी दिनांक २ एप्रिल ते १२ एप्रिल२०२० या कालखंडात नागपूर शहरातील विविध भागांमध्ये जाऊन गरीब व गरजू लोकांना भोजनदान तसेच पाण्याची बॉटलचे वितरण केले होते या यात १५ विध्यार्थानी सहभाग घेतला होता.












गरजूंच्या मदतीसाठी 'यूडी ग्रुप'चा पुढाकार

नागपूर : वडधामना, वाडी, रविनगर, बसस्थानक, रेल्वे स्टेशन, मेडिकल हॉस्पिटल परिसरातील मार्गांवर दिसणाऱ्या गरजूंना 'यूडी ग्रुप'च्या युवा स्वयंसेवकांनी फूड पॅकिट्स, पाण्याच्या बाटल्या, बिस्किटांची पाकीटे वितरित करण्यात आलीत. अनेकांना हॅण्ड ग्लोव्ह्जचेही वितरण करण्यात आले. नील राठोड, उमेश दोनाडकर, समीर गणवीर, राहुल गायकवाड, रवींद्र सोनोने यांच्यासह दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर कॉलेजचे विद्यार्थी निखिल मोटघरे, गौरव महाजन, सरोज भालाधरे यांचा यात पुढाकार आहे.

# आंतरराष्ट्रीय योग दिवस

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी तसेच कार्यक्रम अधिकारी डॉ . रवींद्र तिरपुडे यांनी दिनांक २१ जून २०२० ला आंतरराष्ट्रीय योग दिवस ऑनलाईन पद्धतीने साजरा केला . प्रत्येकाने स्वतःच्या घरूनच ऑनलाइन पद्धतीने योगा व विविध योगासने करून हा दिवस साजरा केला, या कार्यक्रमात जवळपास ५० लोकांनी आपला सहभाग नोंदविला होता.










# आंतरराष्ट्रीय अवयवदान दिवस

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आंतरराष्ट्रीय अवयवदान दिवस १३ ऑगस्ट २०२० ला(google meet ) द्वारे online साजरा करण्यात आला या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून सेवादल महिला महाविद्यालयाचे,व जे अवयवदानावर काम करतात असे डॉ.सुशील मेश्राम,अवयवदानावर ज्यांनी चित्रपट बनवला ते दिग्दर्शक श्री नागेश वाहुरवाग या दोन्ही वक्त्यांनी अवयवदानावर माहिती दिली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या डॉ.बी.ए.मेहेरे,संचालन व आभार कार्यक्रम अधिकारी डॉ.रवींद्र तिरपुडे यांनी केले.या कार्यक्रमात १४२ विध्यार्थानी सहभाग घेतला होता



\\\

## स्वातंत्र्य दिवस.

डॉ. आंबेडकर महाविद्यालयात १५ ऑगस्ट २०२० ला स्वातंत्र्य दिवस साजरा करण्यात आला होता. या दिवशी झेंडावंदन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे ७० विद्यार्थी सहभागी झाले होते




## परिचय सभा

राष्ट्रीय सेवा योजना मध्ये २०२०-२०२१ या सत्रात नवीन विद्यार्थ्यांनी आपली नोंदणी केली, त्यांना राष्ट्रीय सेवा योजने विषयी मूलभूत व इतंभूत माहिती मिळावी,जीवनात राष्ट्रीयसेवा योजनेचे काय महत्व आहे, यासाठी नवीन विद्यार्थ्यांचा परिचय करून देण्यात आला, कार्यक्रम १७ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर या कालखंडात घेतला होता.प्रत्येक दिवशी ३० अशा १५० विद्यार्थांना ही माहिती देण्यात आली.




# संविधान दिवस

डॉ.आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने२६ नोव्हेंबर २०२० ला संविधान दिवस साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती डॉ.भुवनेश्वरी मेहरे यांनी विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना संविधानाचे वाचन करून त्याची शपथ दिली. या कार्यक्रमांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे ५० विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी झाले होते.














# जागतिक एड्स दिवस

डॉ.आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने ३ डिसेंबर २०२० ला जागतिक एड्स दिवसाचे आयोजन( ZOOM ) ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ता म्हणून लता मंगेशकर मेडिकल कॉलेजच्या प्रा.डॉ. किर्ती मेश्राम उपस्थित होत्या, त्यांनी एचआयव्ही एड्स बद्दल मार्गदर्शन केले कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ. बी.ए.मेहेरे मॅडम उपस्थित होत्या कार्यक्रमाचे प्रास्ताविकडॉ.रवींद्र तिरपुडे यांनी केले प्रा.रोहिणी मेश्राम यांनी आभार व्यक्त केले या कार्यक्रमाला १४७ विद्यार्थी सहभागी झाले होते.





महाराष्ट्र टाइम्स नागपूर । शुक्रवार, ११ डिसेंबर २०२०

## एचआयव्ही जनजागृतीसाठी वेबिनार

नागपूर : आज जगात २० लाखांपेक्षा अधिक व्यक्ती शरीरात एचआयव्हीचा विषाणू घेऊन जगत आहेत. शारीरिक असुरक्षिततेमुळे स्वतःला संकटात ओढवून घेण्याचे प्रमाण तरुणांमध्ये दिसते. महाविद्यालयीन तरुणांनी प्रेम आणि आकर्षण समजून घेण्याची गरज आहे. शरीरातील बदलाबरोबरच लैंगिक शिक्षणाचे ज्ञान तरुणांनी घेणे काळाची गरज बनली आहे. त्यामुळे तरुणांनो, बेसावधपणे वागून स्वतःवर संकट ओढवून घेऊ नका, असे प्रतिपादन लता मंगेशकर हॉस्पिटलच्या डॉ. कीर्ती मेश्राम यांनी केले. दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व मनोसामाजिक समुपदेश विभागाच्यावतीने आयोजित जागतिक एड्स निर्मूलन दिवसानिमित्त आयोजित ऑनलाइन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. भुवनेश्वरी मेहरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, प्रा. रोहिणी मेश्राम, प्रा. मिलिंद खेडकर यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रोहिणी मेश्राम यांनी केले. मिलिंद खेडकर यांनी आभार मानले.





# महापरिनिर्वाण दिवस

परमपूज्यडॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, व डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या वतीने दीक्षाभूमी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे ५० विद्यार्थी उपस्थित होते.

# परिसर स्वच्छता अभियान

डॉ.आंबेडकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करण्याचे अभियान राबविण्यात आले होते. या अभियानामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या१२० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करण्याचे काम केले.








# दादासाहेब गायकवाड जयंती

दादासाहेब गायकवाड जय यांची जयंती 29 डिसेंबर 2020 डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे संस्थापक अध्यक्ष दादासाहेब गायकवाड यांची जयंती दीक्षाभूमी परिसरात साजरी करण्यात आली, दीक्षाभूमी परिसरातील त्यांच्या पूर्णाकृती पुतळयाला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला स्मारक समितीचे पदाधिकारी महाविद्यालयाचे प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजनेचे३० विद्यार्थी सहभागी झाले होते.









# सावित्रीबाई फुले जयंती

३ जानेवारी २०२१ डॉ.आंबेडकर महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.बी.ए.मेहेरे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.रवींद्र तिरपुडे व राष्ट्रीय सेवा योजनेचे ५२ विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते. स्त्रियांच्या उन्नतीसाठी सावित्रीबाई फुले यांचे कार्य या विषयावर ऑनलाईन निबंध स्पर्धा घेण्यात आली होती.


Dr. Ambedkar college
Dikhshabhoomi nagpur

the occasion of jubliee of respected SAVITRIBAI FULE ,Dr AMBEDKAR COLLEGE, DIKSHA BHOOMI NAGPUR. NSS DEPARTMENT has organized an ESSAY COMPETITION.

TOPIC: Savitribai Fule's work towards women's improvement.
स्त्रियांच्या उन्नतीसाठी सावित्रीबाई फुले यांचे कार्य.
महिलाओं की उन्नति के लिए सावित्रीबाई फुले इन का कार्य।

The essay can be written in english, hindi and marathi as well.

You can send the essay on the email id provided.

dacnnss2018@mail.com

LAST DATE TO SEND ESSAY IS JANUARY 7TH i.e THURSDAY.

Yours gracious
DR. B. A MEHERE
PRINCIPAL OF DR. AMBEDKAR COLLEGE.

DR. RAVINDRA TIRPUDE
PROGRAM OFFICER OF NSS DEPARTMENT
DR. AMBEDKAR COLLEGE

If any query you can call on the number provided.

Nikhil Motghare
7776023445


२ mtngpletters@gmail.com

अवती-भवती

**'सावित्रीबाई फुलेंना आदर्श माना'**

**नागपूर :** आपण सावित्रीच्या लेकी आहोत. सावित्री आज तुमच्या रूपाने जिवंत आहे. स्त्रियांनी आज विविध क्षेत्रात कार्य करून आपली ताकत दाखवून दिली आहे. पुरुषांच्या बरोबरीने आज स्त्री वेगवेगळ्या क्षेत्रात मोठ्या हिमतीने आपल्या बुद्धीच्या जोरावर मोठे मोठे पद भूषवित आहे. तेव्हा मुलींनो तुम्ही सावित्रीचा आदर्श बाळगा, असे प्रतिपादन प्राचार्या डॉ. बी. ए. मेहरे यांनी केले. दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर कॉलेजमध्ये सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्या डॉ. बी. ए. मेहरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. वर्षा पानबुडे उपस्थित होत्या. मान्यवरांनी आपल्या भाषणातून सावित्रीबाई फुले यांना अभिवादन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे ५० विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन निखिल मोटघरे यांनी केले.





# युवा दिवस


१२ जानेवारी २०२१ राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्वामी विवेकानंद यांची जयंती युवा दिवस म्हणून साजरी करण्यात आली. विवेकानंद यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले.आजचा युवा या विषयावर विषयावर डॉ.रवींद्र तिरपुडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमात ५४ विद्यार्थी उपस्थित होते.






# रक्तदान शिबिर

डॉ.आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आणि बायोकेमिस्ट्री व बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या वतीने १८ जानेवारी २०२१ ला रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रक्तपेढीला रक्तदान करण्यात आले होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या ४० विद्यार्थ्यांनी रक्तदान केले,या शिबिराचे आयोजन कार्यक्रम अधिकारी डॉ.रवींद्र तिरपुडे व बायोकेमिस्ट्री विभागाचे डॉ.उत्पल डोंगरे यांनी केले होते.






## डॉ. आंबेडकर कॉलेजमध्ये आज रक्तदान शिबिर

नागपूर : दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर कॉलेजमध्ये स्वामी विवेकानंद यांची जयंती 'युवा दिना'च्या निमित्ताने सोमवार, १८ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कॉलेजचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि बायोकेमेस्ट्री व बायोटेक्नॉलॉजी विभागाच्यावतीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या सहकार्याने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी रक्तदान करून आपली सामाजिक जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन कॉलेजच्या प्राचार्य डॉ. भूवनेश्वरी मेहेर, रासेयोचे समन्वयक डॉ. रवींद्र तिरपुडे, समन्वयक उत्पल डोंगरे यांनी केले आहे.



## डॉ. आंबेडकर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे रक्तदान

नागपूर : दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर कॉलेजमध्ये स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. कॉलेजचा एनएसएस विभाग आणि बायोकेमेस्ट्री व बायोटेक्नॉलॉजी विभागाच्यावतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्राचार्य भुवनेश्वरी मेहरे, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. उत्पल डोंगरे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या डॉ. ऐश्वर्या वारके, किशोर घरमाळे, रॉबिन जॉन, जागृती सिंगनजुडे, नितीन बेलसरे, आनंद मडके यांनी रक्तसंकलन केले.









# गणतंत्र दिवस 26 जानेवारी

२६ जानेवारी २०२१ ला महाविद्यालयात गणतंत्र दिवस साजरा करण्यात आला, या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे ८० विद्यार्थी सहभागी झाले होते.









## पथनाट्यातून मांडले ज्वलंत विषय

नागपूर : दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर कॉलेजमध्ये प्रजासत्ताकदिनानिमित्त 'होश ठिकाणे आयेगा' पथनाट्य सादर करण्यात आले. शिक्षकांचे कर्तव्य, विद्यार्थ्यांचे प्रश्न, मजुरांच्या समस्या, शेतकऱ्यांची व्यथा आदी मुद्द्यांना वाचा फोडण्याचा प्रयत्न करण्यात आला. पथनाट्याची संकल्पना रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांची होती. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक निखिल मोटघरे यांनी पथनाट्याचे लेखन केले. हर्षला सोर्गीले, सिया मिश्रा, रिया उईके, प्रतीक गाडगे, प्रणव नागमोते, आयुष माळे, श्रावणी सांबारे, विशिता डोंगरे, रोहित भारती, हिमांशू मिश्रा, मयंक दुधे, टीना जांगिड, आरती घोटकर, प्रज्वल खोडापे आदी रासेयो स्वयंसेवकांचा सहभाग होता. स्मारक समितीचे अध्यक्ष भदन्त आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. कार्यक्रमाला स्मारक समितीचे सचिव डॉ. सुधीर फुलझेले, स्मारक समितीचे सदस्य ॲड. आनंद फुलझेले, प्राचार्या डॉ. भूवनेश्वरी मेहेरे, स्टेट ऑफिसर डॉ. अरुण जोसेफ आदी उपस्थित होते.

# फ्लावर शो

२९ व ३० जानेवारीला महाविद्यालयातील स्पोर्ट ग्राउंडवर फ्लावरशो चे आयोजन करण्यात आले होते स्मारक समितीचे अध्यक्ष भदन्त आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या हस्ते या फ्लॉवरचे उद्घाटन करण्यात आले, या कार्यक्रमाला स्मारक समितीचे सचिव डॉ.सुधीर फुलझेले, प्राचार्य डॉ. बी.ए.मेहेरे उपप्राचार्य डॉ.ए. पी.जोशी उपस्थित होते या शोमध्ये फुलांची विक्री व झाडांची व फुलांची माहिती प्रत्यक्ष सहभागी लोकांना देण्यात आली होती.ही माहिती देण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेच्या १२ विद्यार्थ्यांनी केले.










# वाहतूक नियंत्रण व सुरक्षा

२४ जानेवारी २०२१ ला “वाहतूक नियंत्रण व सुरक्षा” या विषयावर सुरेश भट सभागृह रेशीमबाग नागपूर येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन केंद्रीय वाहतूक मंत्री माननीय नितीनजी गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले होते. या कार्यक्रमाला सिनेअभिनेता मकरंद अनासपुरे उपस्थित होते. त्याचप्रमाणे महानगरपालिकेचे आयुक्त महापौर दयाशंकर तिवारी उपस्थित होते या कार्यक्रमात डॉ.आंबेडकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या १५विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता

